महाराष्ट्र शासन

# श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे


दूरध्वनी क्रमांक (०२५६२-२३९४०८) फॅक्स क्रमांक (०२५६२-२३९२०७)


जा.क्रं.श्रीभाहिशावैमधु/राजप- २/ 5751-56 / २०२१ दिनांक :- 16/ ०६ /२०२१

## -: जा हि रा त :-

विषयः- सहाय्यक प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी व रक्त संक्रमण अधिकारी (कोविड-१९ साठी) ही पदे (Walk-in- Interview) प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात भरण्याबाबत.....

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१ मे २०२१
२) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था ८, दिनांक १४ जून २०२१

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या त्रुटीच्या पूर्ततेसाठी तसेच अबांधित रुग्णसेवेच्या दृष्टीने, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय धुळे येथील आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापक/वैद्यकीय अधिकारी व रक्त संक्रमण अधिकारी या पदासाठी तसेच यापुढे वेळोवेळी रिक्त होणा-या पदांवर १२० दिवसासाठी (Walk-in-Interview) प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे भरण्याकरीता पदवी/पदव्यु-त्तर (एम.बी.बी.एस व एम.डी./एम.एस.) अर्हता प्राप्त उमेदवारांकडून जाहिरातीच्या दिनांकापासुन २५/०६/२०२० रोजी ५.०० वाजेपर्यत अर्ज मागविण्यांत येत असून प्रत्यक्ष मुलाखतीचे आयोजन दिनांक २९/०६/२०२१ रोजी दुपारी ठिक ११.०० वाजता मा. वैद्यकीय अधिक्षक कार्यालय, श्री. भाऊसाहेबहिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे आयोजीत केलेले आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुटया वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासुन विहीत कालावधीत डीएसबी फार्म फी रु.२५०/- भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. व अर्जात नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मुलाखतीचे वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर राहावे.

संदर्भ क्र.१ व संदर्भ २ च्या शासन निर्णच्यान्वये मा.सर्वोच्च न्यायालयीने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/१९ व इतर यांकांमध्ये दिनांक ०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार शासकीय नोक-यामधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवार्गासाठीचे आरक्षण रदद ठरविलेले आहे. या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०५/०५/२०२१ रोजीच्या निर्णयानुसार सदर जाहिरातीमधील एसईबीसी प्रवार्गासाठी राखीव ठेण्यात आलेले पदो अराखीव प्रवर्गात रुपांतरीत करण्यांत आलेले आहे.

सहाय्यक प्राध्यापक

| अक्र | विभागाचे नांव | रिक्त पदे | | SC 13% | ST 7% | VJ 3% | NT-1 2.5% | NT-2 3.5% | NT-3 2% | SBC 2% | OBC 19% | SEBC 16% | OPEN 22% | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालय | सर्वोपचार रुग्णालय | | | | | | | | | | | |
| १ | शरीररचनाशास्त्र | ०१ | ०० | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | ०० | | | | | | | | | | ०१ | ०१ |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ०२ | ०० | | | | | | ०१ | | ०१ | | | ०२ |
| ४ | सुक्ष्मजीवशास्त्र | ०२ | ०० | | | | | | | | | ०१ | ०१ | ०२ |
| ५ | औषधशास्त्र | ०२ | ०० | | ०१ | | | | | | ०१ | | | ०२ |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०३ | ०० | ०१ | | | | ०१ | | | | ०१ | | ०३ |
| ७ | क्षय व उरोरोग | ०१ | ०० | | | | | | | | | | ०१ | ०१ |
| ८ | मनोविकारशास्त्र | ०१ | ०० | | ०१ | | | | | | | | | ०१ |
| ९ | बधिरीकरणशास्त्र | ०० | ०१ | | | | | | | | | ०१ | | ०१ |
| १० | क्ष-किरण शास्त्र | ०३ | ०२ | ०१ | | ०१ | | | | | ०१ | | ०२ | ०५ |
| ११ | कान-नाक व घसा | ०१ | ०१ | ०१ | | | | | | | ०१ | | | ०२ |
| १२ | कम्युनिटी मेडीसीन | ०२ | ०० | | ०१ | ०१ | | | | | | | | ०२ |
| १३ | शरीरविकृतीशास्त्र | ०० | ०२ | | | | | | | | ०१ | | ०१ | ०२ |
| १४ | औषघवैद्यकशास्त्र | ०३ | ०७ | ०१ | | | ०१ | ०१ | | | ०१ | ०२ | ०४ | १० |
| १५ | बालरोगशास्त्र | ०२ | ०१ | | | | | | | ०१ | | | ०२ | ०३ |
| १६ | शल्यचिकित्साशास्त्र | ०४ | ०४ | | | | | | | | ०२ | ०२ | ०४ | ०८ |
| १७ | अस्थिव्यंगोपचार | ०२ | ०० | ०१ | | | | | | | ०१ | | | ०२ |
| १८ | स्त्रीरोग व प्रसूती | ०० | ०१ | | | | | | | | | ०१ | | ०१ |
| | एकूण | ३० | १९ | ०६ | ०३ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०९ | ०८ | १६ | ४९ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी व रक्तसंक्रमण अधिकारी (रुग्णालय) | | | | | | | | | | | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी | ०० | ०९ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | | | ०१ | | ०३ | ०९ |
| २ | रक्तसंक्रमण अधिकारी | ०० | ०१ | | | | | | | | ०१ | | | ०१ |
| | एकूण पदे | ०० | १० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०२ | | ०३ | १० |

अटि व शर्ती

१.वेतनश्रेणीः- सहाय्यक प्राध्यापक पदांसाठी वेतनश्रेणी शासन निर्णय क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, दि.३१ डिसंबर २०२० अन्वये रु.१,१०,०००/- ठोक मानधन (१०) कंत्राटी सेवा लेखाशिर्षाखाली वेतन अशी आहे.

२.वयोमर्यादा :- वरील सर्व पदांकरीता वयोमर्यादा ४० वर्षे, मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३.वरील सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व वेतनश्रेणी महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार लागू राहील.

४.वरील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांचा विचार केला जाईल.

५.वरील पदांच्या संस्थेत कमी अथवा वाढ करण्याचा तसेच निवड समितीमार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमीत अथवा प्रलंबीत ठेवण्याचे अथवा जाहिरात रद्य करण्याचे सर्व अधिकार संस्थाप्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत.

६.सदरील पदावर मा.संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे कडून बंधपत्रित उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने सरळसेवेने अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध झाल्यास आपली सेवा समाप्त केली जाईल.

७.उमेदवार या महाविद्यालय व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी एम.सी.आय च्या निरीक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे असल्यास केव्हा (तारीख नमूद करावी) व तसे अर्जासोबत जोडावे.

८.उमेदवार कोठेही कार्यरत नसल्यास उमेदवाराने कार्यरत नसल्याचे स्वःत प्रमाणित करुन तसे पत्र अर्जासोबत जोडावे.

टिपः- निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्विकारण्यापूर्वी / रुजू होतांना १ महिन्याचे मानधन रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखा विभागात जमा करुन प्राप्त प्राप्तीची नोंद विद्यार्थी विभागात करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम नियुक्ती कालावधी समाप्त झाल्यानंतर अथवा पदाचा राजीनामा १ महिन्याची पूर्व सूचना देवून दिला असल्यास मिळू शकेल. १ महिन्याची आगावू नोटिस न देता पदाचा राजीनामा दिल्यास अनामत रक्कम सरकारजमा करण्यांत येईल याची नोंद घ्यावी..

अधिष्ठाता
श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय,धुळे

प्रति,

१. सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख ———————————श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

२.वैद्यकीय अधिक्षक कार्यालय, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वो. रुग्णालय, धुळे.

३.सर्व अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ———————————

(पुणे /सोलापूर/ नागपूर/यवतमाळ/नांदेड /कोल्हापूर/लातूर/औरंगाबाद /मिरज /अकोला /अंबाजोगाई /चंद्रपूर /गोंदिया)

यांना माहितीस्तव व विनंती करण्यांत येते की, सदरील जाहिरात आपल्या कार्यालयातील नोटिसबोर्डावर लावण्यात यावी.

४. सुचना फलक, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

५. ग्रंथालय सुचना फलक श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे.

६. मा.संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

७. मा.अपर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग नवीन मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.